***<u>रे. मु. नं. १२७/२०१६ मधील निशाणी क्रमांक २९ वरील आदेश.</u>***

*१. वादींनी वादपत्रामध्ये विशेष करुन दावा मिळकतीचे वर्णनाचे अनुषंगाने दुरुस्ती करण्यासाठी परवानगी मिळावी यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला. त्यांचे म्हणण्याप्रमाणे वादपत्रामधील परिच्छेद क्रमांक १ मधील दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये म्हणजेच ओळ क्रमांक ३ व ४ मध्ये हद्दीतील सामाईक मिळकत पुर्वीचा सर्व्हे नंबर ३०५/अ सध्याचा गट नंबर ५८२ हिस्सा नंबर १ मध्ये क्षेत्र ००.०४ गुंठे आकार २.०० रुपये असे नजरचुकीने व टंकलेखनाच्या दोषाने चुकीचे नमुद झाले आहे. तरी या अर्जामध्ये नमुद केलेल्या मजकुराप्रमाणे वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्याची त्यांनी विनंती केली.*

*२. प्रतिवादींनी निशाणी क्रमांक ३० वर म्हणणे देऊन प्रस्तुतच्या अर्जास विरोध केला. त्यांचे म्हणण्याप्रमाणे वादींचा दावा दुरूस्तीचा अर्ज व त्यातील कोणतीही कथने त्यांना मान्य नाही. सदरच्या दावा दुरूस्तीच्या अर्जामुळे वादातील मिळकतीत व दाव्याच्या स्वरूपात देखील फार मोठा बदल होत आहे. त्यामुळे त्यांनी अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली.*

*३. दोन्ही पक्षकारांचा प्रदिर्घ युक्तिवाद ऐकला. त्या युक्तिवादाच्या पार्श्वभुमीवर संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. त्यावरुन असे दिसुन येते की, सदरचे प्रकरण अद्याप पावेतो सुनावणीसाठी लागलेले नाही. वास्तविक कोणत्याही दिवाणी दाव्यामध्ये सुनावणी सुरु होण्यापुर्वी पक्षकारांनी वादपत्रामध्ये अथवा कैफियतीमध्ये दुरुस्तीस परवानगी मागितल्यास ती साधारणतः मंजुर करता येते. परंतु प्रकरणाची सुनावणी सुरु झाल्यानंतर ज्या पक्षकाराने नियोजीत दुरुस्तीस परवानगी मागितली आहे त्याने नियोजीत दुरुस्तीमधील मुद्दे पुर्वी प्रयत्न करुनही तो उपस्थित करु शकला नाही अशी परिस्थिती अभिलेखावर आणणे गरजेचे असते.*

*४. या अनुषंगाने वादींनी प्रस्तुत अर्जात असे कथन केले आहे की, नजरचुकीने व टंकलेखनाचे दोषामुळे दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये चुकीचा मजकुर नमुद झाला आहे. तसेच वादींनी अर्जात मागितलेली दुरुस्ती ही केवळ हद्दीतील सामाईक मिळकत पुर्वीचा सर्व्हे नंबर ३०५/अ हिस्सा नंबर १ मध्ये सध्याचा गट नंबर ५८२ मध्ये क्षेत्र ००.०४ गुंठे आकार २.०० रुपये अशा स्वरूपाची आहे. त्यामुळे नियोजीत दुरुस्तीने प्रतिवादींवर किंवा त्यांच्या बचावावर विपरीत परिणाम होण्याचे कारण नाही.*

*५. वादींनी त्यांचे कथनापुष्ठयर्थ बाळासाहेब भिमाजी घोरपडे यांचे निशाणी क्रमांक ३० वर शपथपत्र दाखल केले आहे. त्यामध्ये अर्जातील कथनांचा पुनर्उच्चार दिसुन येतो. दुसरे म्हणजे अशा अर्जावर विचार करत असतांना दोन्ही पक्षकारांमधील वादावर निर्णय घेण्यासाठी*

*नियोजीत दुरुस्ती आवश्यक आहे किंवा नाही ? हे देखील पाहणे गरजेचे असते. त्या अनुषंगाने दाव्याचे स्वरुप व मागणी केलेली नियोजीत दुरुस्ती विचारात घेता निश्चितपणे ती दोन्ही पक्षकारांमधील वादावर निर्णय घेण्यासाठी आवश्यक वाटते. या सर्व बाबींचा विचार करुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.*

***<u>आ दे श</u>***

**१.** *वादींचा अर्ज रुपये ३००/- खर्चास अधिन राहुन मंजूर करण्यात येतो.*

**२.** *वादींनी निशाणी क्रमांक २९ वर मागणी केल्याप्रमाणे वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याची त्यांना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ प्रमाणे परवानगी देण्यात येते.*

**३.** *वादींनी सदरची दुरुस्ती आदेशापासुन १४ दिवसात करावी व दुरुस्त वादपत्र अभिलेखावर दाखल करावे.*

*(सुहास प्र. भोसले)*
*२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर*
*राहाता.*

*दिनांक :- २५/०९/२०१७.*